# मराठी (प्रथम भाषा) : इ. ६ वी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे–३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

## संकलित मूल्यमापन २ : २०२४–२५

### इयत्ता – सहावी : विषय – मराठी (प्रथम भाषा)

---

विद्यार्थ्याचे नाव : ____________________ हजेरी क्रमांक : [ ]

शाळेचे नाव : ____________________ तुकडी : ________

केंद्र : __________ ता. __________ जि. __________ दिनांक : / /२०२५

**अध्ययन निष्पत्तीनिहाय व प्रश्ननिहाय गुणनोंदणी तक्ता**

| अध्ययन निष्पत्ती क्रमांक | 06.01.02 | 06.01.11 | 06.01.19 | 06.01.03 | 06.01.08 | 06.01.09 | 06.01.10 | 06.01.14 | 06.01.15 | 06.01.16 | 06.01.17 | 06.01.25 | 06.01.26 | 06.01.28 | तोंडी गुण | लेखी गुण | एकूण गुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १ ते ३ | ४ ते १४ | १ ते १४ | |
| निर्धारित गुण | ३ | ४ | ३ | ५ | ५ | ४ | ३ | ४ | ४ | २ | ३ | ३ | २ | ५ | १० | ४० | ५० | |
| एकूण प्राप्त गुण | | | | | | | | | | | | | | | | | | |

**तोंडी चाचणी**

**प्र. १)** शाळेत साजरा झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाविषयी ४ ते ५ वाक्यांत माहिती सांग. (गुण ३)

**प्र. २)** खालील परिच्छेदाचे प्रकटवाचन कर. (गुण ४)

> शेवटी 'हा नाद सोड, डॉक्टरांचा फोन जोड' असा भाच्याचा उपदेश शिरोधार्य मानून मी डॉक्टरांना फोन केला. 'तपासल्याशिवाय कसं कळेल?' त्यांनी प्रश्न केला. मग दवाखाना गाठला. तिथे हीऽऽ गर्दी. कुणाचा पाय प्लास्टरमध्ये, कुणी कुबड्याधारी, कुणाचे हात गळ्यात (म्हणजे स्वत:चे हात स्वत:च्या गळ्यात) असल्या अलौकिक अवस्थेतले एकेक जण पाहिल्यावर पोटात



Scanned with OKEN Scanner

गोळा आला. इथून पळ काढावा असं वाटत होतं. आमच्या त्या 'बाणेदार' बोटात आता असंख्य बाण घुसल्याच्या वेदना होत होत्या. त्यामुळे डॉक्टरांना भेटणं भागच होतं. हाडबिड तुटलं नसेल ना? अशी भीती वाटत होतीच.

**प्र. ३) इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकातील कोणतीही कविता साभिनय म्हण. (गुण ३)**

---

## लेखी चाचणी

**प्र. ४) खालील मुद्द्यांच्या आधारे आठ ते दहा ओळींत कथा लिही व कथेला योग्य शीर्षक दे. (गुण ५)**

सोनू नावाचा मुलगा..... चित्रकलेची आवड..... शाळेत चित्रकला स्पर्धा जाहीर.......... स्पर्धेत सहभाग........ चित्र काढण्यास सुरुवात......... रंगपेटीतील रंग संपले........... सोनू निराश........ हार न मानणे..... चित्र पूर्ण..... प्रथम क्रमांक........... कौतुक.

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

**प्र. ५) खालील उतारा वाच व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ५)**

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर खाशाबांनी टिळक हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. गोळेश्वर गावापासून हायस्कूल पाच किलोमीटर दूर होते. सकाळी शाळेत लवकर पोहोचण्यासाठी खाशाबा रोज चालत न जाता पळत जायचे व अंधार पडण्यापूर्वी घरी परतता यावे म्हणून पळत यायचे. पळत जाण्या-येण्याच्या सवयीमुळे त्यांचा कुस्तीतला दम चांगलाच तयार होत गेला. अनवाणी



Scanned with OKEN Scanner

पायानी धावल्यामुळे पाय काटक बनले. पावसाळ्यात झाडाझुडपांतून गुडघ्यापर्यंत चिखल तुडवत, पावसाची तमा न बाळगता खाशाबांनी शिक्षण व व्यायामाची साधना केली.

जगातील सर्वोत्तम समजल्या जाणाऱ्या ऑलिंपिक क्रीडास्पर्धेचा पंधरावा महोत्सव फिनलँडची राजधानी हेलसिंकी येथे १९५२ साली पार पडला. तेथे खाशाबांनी भारताला कुस्ती या खेळप्रकारात कांस्यपदक मिळवून दिले. ऑलिंपिक क्रीडास्पर्धेत भारताला मिळालेले हे पहिले पदक होय.

अ) खालील आकृती पूर्ण कर. (गुण २)

| | | |
|---|---|---|
| .......................... | **कुस्तीसाठी खाशाबाचे शरीर बळकट होण्याची कारणे** | .......................... |

आ) सन १९५२ मधील ऑलिंपिक स्पर्धेत भारताला पहिले पदक मिळाले तो खेळ (गुण १)

..............................................................................

इ) सन १९५२ मध्ये ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा पार पडल्या तो देश (गुण १)

..............................................................................

ई) उताऱ्यास समर्पक शीर्षक दे. (गुण १)

..............................................................................

**प्र. ६) खालील उतारा वाच व त्याखालील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ४)**

आकाशला नेहमी अभ्यासात रस होता. तो रोज नियमितपणे अभ्यास करत असे. पण, त्याला नेहमी वाटायचं की मेहनत घेऊनही यश त्याच्या हातून निसटतंय. एके दिवशी त्याच्या शिक्षकांनी वर्गात एक गोष्ट सांगितली. त्यांनी सांगितलं की,''संधी ही आपल्यासमोर नेहमी येत असते पण आपण ती ओळखली नाही, तर ती हातून निसटते. जीवनात यशस्वी होण्यासाठी योग्य वेळी संधीचं सोनं करायला शिका.''

ही गोष्ट आकाशच्या मनाला स्पर्शून गेली. त्याने ठरवलं की आता प्रत्येक संधीचं महत्त्व



Scanned with OKEN Scanner

ओळखायचं आणि तिचा योग्य उपयोग करायचा. शाळेत एका वक्तृत्व स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं. आकाशनेही यात भाग घेण्याचं ठरवलं. सुरुवातीला त्याला भीती वाटली, पण त्याने मेहनत सोडली नाही. त्याच्या सरांनीही त्याला मार्गदर्शन केलं.

स्पर्धेच्या दिवशी आकाशने मनापासून प्रयत्न केला आणि त्याला पहिला क्रमांक मिळाला. त्याच्या यशाचं संपूर्ण शाळेत कौतुक झालं. त्याला कळलं की, जीवनात संधीचं महत्त्व किती मोठं आहे. योग्य वेळ आणि मेहनत यामुळे तो यशस्वी होऊ शकला.

अ) उताऱ्याच्या आधारे आकाशचा एक गुणविशेष लिही. (गुण १)

..........................................................................................

आ) आकाश स्पर्धेत यशस्वी होण्याचे कारण - (गुण १)

..........................................................................................

इ) वक्तृत्व स्पर्धेसाठी कोणत्याही दोन सूचना तयार कर व लिही. (गुण २)

..........................................................................................

..........................................................................................

**प्र. ७) खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ३)**

आतां उजाडेल!
खिन्न आंधळा अंधार
आतां ओसरेल पार
लहरींत किरणांची कलाबूत मोहरेल
आतां उजाडेल!

शुभ्र आनंदाच्या लाटा
गात फुटतील आतां
मृदु गळ्यांत खगांच्या किलबिल पालवेल
आतां उजाडेल!



Scanned with OKEN Scanner

वारा हसेल पर्णांत
मुग्ध हिरवेपणांत
गहिवरल्या प्रकाशीं दहिंवर मिसळेल
आतां उजाडेल!

आनंदांत पारिजात
उधळील बरसात
गोड कोंवळा गारवा सुगंधांत थरारेल
आतां उजाडेल!

**अ)** पुढील अर्थाच्या कवितेच्या ओळी लिही. (गुण १)

| अर्थ | कवितेच्या ओळी |
|---|---|
| सूर्योदय झाल्याच्या आनंदाने पारिजातक आपल्या फुलांची उधळण करेल व त्या फुलांच्या गोड, कोवळ्या व गार असणाऱ्या सुगंधात आजूबाजूचा परिसर थरारून जाईल. | ............................................<br>............................................<br>............................................<br>............................................ |

**आ)** 'पांढरा' या अर्थाचा कवितेत आलेला शब्द लिही. (गुण १)

............................................................................................

**इ)** कवितेतील यमक जुळणारी कोणतीही एक जोडी शोधून लिही. (गुण १)

............................................................................................

**प्र. ८) उन्हाळी सुट्टीतील तुझे अनुभव सात ते आठ वाक्यांत तुझ्या शब्दांत लिही. (गुण ४)**

............................................................................................

............................................................................................

............................................................................................

............................................................................................

............................................................................................



Scanned with OKEN Scanner

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**प्र. ९) खालील सूचना वाच व दिलेल्या तक्त्यात त्यांचे वर्गीकरण कर.** **(गुण ४)**

१) रुग्णांशी हळू आवाजात बोलावे.

२) पुण्याला जाणारी गाडी फलाट क्र. ४ वर उभी आहे.

३) आरक्षित तिकिटांसाठी रांगेत उभे रहा.

४) रुग्णांसंबंधी येथे चौकशी करा.

| **एसटी स्थानक** | **रुग्णालय** |
|---|---|
| .......................................... | .......................................... |
| .......................................... | .......................................... |
| .......................................... | .......................................... |
| .......................................... | .......................................... |

**प्र. १०) खालील वाक्यात योग्य त्या ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिही.** **(गुण २)**

आपली सहल नीट पार पडेल का या विचारात अजय शाळेत पोहोचला

..........................................................................................

**प्र. ११) खाली दिलेल्या सूचनेनुसार उत्तरे लिही.** **(गुण ३)**

**अ)** चौकटीतील म्हण ओळख व लिही. (गुण १)

| | | |
|---|---|---|
| दू | सा | डों |
| जि | रू | ग |
| रे | र | न |

..........................................................................................



Scanned with OKEN Scanner

आ) इकडे-तिकडे या शब्दाचा वापर करून वाक्य तयार कर व लिही. (गुण १)

..........................................................................................................

इ) खालील चौकटीतील अक्षरांपासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दाच्या अर्थाचा योग्य पर्याय निवड व लिही. (गुण १)

| | |
|---|---|
| क | न |
| दि | र |

१) दिवस २) दिन ३) कर ४) रवी

योग्य पर्याय : ..............................

**प्र. १२) तुझ्या परिसरातील 'डॉक्टर' अथवा 'शाळेतील शिक्षक' यांपैकी एका व्यक्तीविषयी चार ते सहा वाक्यांत माहिती लिही. (गुण ३)**

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

**प्र. १३) पुढील घटना योग्य व सुसंगत क्रम लावून पुन्हा लिही. (गुण २)**

१) "आम्ही डहाळे उपटू लागलो तेवढ्यात तिकडून कोणीतरी जोरात ओरडले."

२) "शिवार फिरून झाल्यावर परतताना मात्र त्या शेतकऱ्याने आम्हां सर्व मुलांना हरभऱ्याचे थोडेसे डहाळे दिले."

३) "आम्हांला रस्त्यात एक शिवार लागले डहाळे, कणसे, ओंब्या पाहून आमच्या तोंडाला पाणी सुटले."

४) "आम्ही त्या शेतकऱ्याची माफी मागितली."

..........................................................................................................



Scanned with OKEN Scanner

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

**प्र. १४) सूचनेनुसार उत्तरे लिही.** **(गुण ५)**

**अ)** 'आजीने तिला गोष्ट सांगितली' या वाक्यातील सर्वनाम लिही. (गुण १)

.............................................................................................................

**आ)** 'घरासाठी' कोणते विशेषण योग्य होणार नाही ते पर्यायांतून निवडून लिही. (गुण १)

१) कौलारू   २) दुमजली   ३) पाणीदार   ४) टुमदार

.............................................................................................................

**इ)** काळ्या ढगांनी आकाशात गर्दी करताच मोर नाचू लागला. (गुण १)

वरील वाक्यात मोराऐवजी लांडोर हे नाम घेतल्यास कोणते क्रियापद येईल? योग्य पर्यायाला गोल कर.

१) लागले   २) लागला   ३) लागली   ४) लागतो

**ई)** इयत्ता सहावीच्या वर्गातील विद्यार्थी अभ्यासात मग्न .............................. (गुण १)

हे वाक्य वर्तमानकाळी करण्यासाठी खालीलपैकी कोणते क्रियापद योग्य होईल? योग्य पर्यायाला गोल कर.

१) होती   २) असतील   ३) आहेत   ४) करतात

**उ)** खालील वाक्याचा काळ ओळखून लिही. (गुण १)

वाक्य : अजय सहलीला जाणार आहे.

काळ : ..............................................

■■■



Scanned with OKEN Scanner